नि. दि. दावा क्र. ३८०-२०२३
निशाण क्र.१२० ची पुरवणी

<u>वादी साक्षीदार क्र.२ यांची उलटतपासणी प्रतिवादी क्र. १ तर्फे वकील श्री. एम.बी.कांबळे यांचे तर्फे शपथेवर सुरु –</u>

प्रतिवादी क्र. १ व त्यांचे विधिज्ञांना वारंवापर पुकारले असता गैरहजर, करिता उलटतपास नाही.

<u>वादी साक्षीदार क्र.२ यांची उलटतपासणी प्रतिवादी क्र. २ तर्फे वकील श्री. के.एस.मांगले यांचे तर्फे शपथेवर सुरु –</u>

माझे शिक्षण इयत्ता तिसरी पर्यंत झालेले आहे. दावा मिळकतीच्या पुर्वेस अरूण यांची जमिन, पश्चिमेस पवार यांची जमिन, दक्षिणेस माझी स्वत:ची जमिन, उत्तरेस गट नं. ३०६/२ मधील जमिन आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत आमचे वडिलार्जित मिळकत आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादग्रस्त मिळकत ही माझे आजोबा यांचेकडुन माझे वडीलांकडे व माझे वडीलांकडुन माझे कडे आलेली आहे. माझे आजोबाचे नाव निवृत्ती रामा बादल असे होते. हे म्हणणे खरे नाही की, वादग्रस्त मिळकत आजोबा कडुन निवृत्ती बादल यांनी विकत घेतलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, सन १९८५ साली विश्वनाथ गणपत कोरे यांना भिमराव बादल यांनी गहाणखत करून दिलेले होते. हे मला सांगता येणार नाही की, सोमनाथ गिराम यांचे खरेदी खत केंव्हा झाले आहे.

भिमराव बादल हे कोणत्या वर्षी मयत झाले हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, गट नं.३०६/३/ड मधील ०1हे. ६२आर. क्षेत्राचे खरेदी खत सोमनाथ गिराम यांना दिलेपासुन ते क्षेत्र भिमराव बादल यांच्याच ताब्यात ते मयत होईपर्यंत होते. साक्षीदार सांगतो की, भिमराव बादल मयत झाले पासुन ते क्षेत्र माझे कडे आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट नं. ३०६/३/ड मधील मिळकत ही भिमराव बादल यांना सोमनाथ गिराम यांनी केवळ पैशाला तारण म्हणुन दिलेली होती. हे म्हणणे खरे नाही की,सोमनाथ व भिमराव मधील जमिनीचा व्यवहार हा खरेदी खत पलटून देणेबाबतीतील होता. साक्षीदार सांगतो की, तो व्यवहार खरेदीचा होता. हे मला माहिती नाही की, रामेश्वर बादल यांनी सोमनाथ यांचे विरुध्द सहाय्यक निबंधक यांचेकडे सावकारी करत असलेबाबत तक्रारी अर्ज दाखल केला होता किंवा कसे. हे म्हणणे खरे

नाही की, त्या प्रकरणात मी सहाय्यक निबंधक करमाळा यांचेकडे साक्ष दिलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, सहाय्यक निबंधक करमाळा यांनी वादग्रस्त मिळकत ही सावकारीत दिलेबाबतचा अहवाल दिलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट नं. ३०६/३/ड ही सोमनाथ गिराम यांनी जमिन मला बटईने दिलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या मिळकतीतील निम्मे उत्पन्न मला तर निम्मे उत्पन्न सोमनाथ यांना जाते. हे म्हणणे खरे नाही की, सोमनाथ गिराम हा वादग्रस्त मिळकतीकडे कधीही येत नाही.

हे मला माहिती नाही की, वादग्रस्त क्षेत्र ज्यावेळी भिमराव बादल यांनी सोमनाथ बादल यांना दिले होते त्यावेळी त्याचे वाटप झाले होते किंवा कसे. साक्षीदार सांगतो की, त्यावेळी ते क्षेत्र भिमराव बादल यांचेच नावे होते. हे म्हणणे खरे नाही की, माझे मध्ये व गिराम मध्ये चांगले संबंध आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझे व प्रतिवादी क्र. १ ते ३ मध्ये वितुष्ट निर्माण झालेले असल्याने त्या रागातुन मी आज रोजी न्यायालयात साक्ष देणेकामी आलेलो आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी विरुध्द मी गुन्हा दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या गुन्ह्याचा मनात राग धरून प्रतिवादीच्या विरुध्द व वादीच्या लाभात साक्ष देणेकामी आलेलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी पुराव्याचे शपथपत्र वादी यांचे सांगण्याप्रमाणे तयार केलेले आहे. मला न्यायालयाचे दाव्याकामी समन्स आलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी न्यायालयात खोटे पुराव्याचे शपथपत्र दाखल करुन आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>वादी साक्षीदार क्र.२ यांची उलटतपासणी प्रतिवादी क्र. ३ तर्फे वकील श्री. एम.बी.कांबळे यांचे तर्फे शपथेवर सुरु –</u>**

प्रतिवादी क्र. ३ व त्यांचे विधिज्ञांना वारंवार पुकारले असता गैरहजर, करिता उलटतपास नाही.

उलटतपास संपला, फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती,

(एस.एम.घुगे)
दिवाणी न्यायाधीश व.स्तर, करमाळा

दि. १९–०९–२०२५